रे.दि.मु.नं. २२९/२०१४ मधील नि. ५८ खालील आदेश
( शोभावती वाघमोडे व इतर वि.शिवाजी भगवान पाटील व इतर )
CNR No.MHSO20-000935-2014

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र. ३ यांचे वारसातर्फे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करुन मिळावा यासाठी दाखल केलेला आहे. वादी क्र. ३ तर्फे त्यांचे वारसांचे कथनानुसार सदरचा दावा चालू असताना वादी क्र. ३ तारामती रामचंद्र भंडारे ही दि. २६/०८/२०२० रोजी मयत झालेली आहे. कोरोना या आजारामुळे न्यायालयीन कामकाज पूर्णपणे चालू नसल्यामुळे व सदर दाव्याची माहिती या वादी क्र. ३ चे वारसांना माहिती नसल्यामुळे सदरची माहिती वादी क्र.१ यांचेकडुन त्यांना दि.२६/०२/२०२१ रोजी समजली आहे. त्यामुळे त्यांनी त्वरीत माहिती घेऊन हा अर्ज दाखल केला आहे. वादी क्र. ३ यांचे वारसांना कायदा मुदतीत दाव्याची माहिती न झाल्यामुळे सुमारे १८४ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा वादी क्र. ३ यांचे वारसांनी जाणुनबुजून केलेला नाही. सदरचा विलंब माफ झाला तर प्रतिवादींचे कांहीही नुकसान होणार नाही. याउलट, वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी वादी क्र. ३ यांचे वारसांनी झालेला विलंब माफ करणेविषयी विनंती केली आहे.

२. सदरच्या अर्जावर प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे म्हणणे दिले आहे की, सदरचा अर्ज त्यांना मान्य व कबुल नाही. सबब, तो नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. सदरच्या अर्जावर दोन्हीं वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे रेकॉर्ड तपासून पाहिले असता वादी क्र. ३ यांचे वारसांचे कथनानुसार सदरचा दावा चालू असताना वादी क्र. ३ तारामती रामचंद्र भंडारे ही दि. २६/०८/२०२० रोजी मयत झालेली आहे. कोरोना या आजारामुळे न्यायालयीन कामकाज पूर्णपणे चालू नसल्यामुळे व सदर दाव्याची माहिती या वादी क्र. ३ चे वारसांना माहिती नसल्यामुळे सदरची माहिती वादी क्र.१ यांचेकडुन त्यांना दि.२६/०२/२०२१ रोजी समजली आहे. तरी देखील मुदतीमध्ये वारस रेकॉर्डवर न घेतल्याची बाब स्पष्ट होते. वादी क्र. ३ यांचे वारसांतर्फे अर्जामध्ये नमूद केलेले कारण तसेच दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्हीं पक्षकारांना योग्य ती संधी देणे आवश्यक आहे. वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ केल्याचे प्रतिवादींचे कांहीही नुकसान होणार नाही. याउलट, दावा गुणदोषांवर निर्गत होणेस मदतच होईल. विलंबाचे कारण पाहता वादींचे वर खर्च ठेवणे योग्य वाटत नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१) अर्ज (नि.५८) मंजूर करण्यात येतो.

२) वादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SEEMA KETAN DESHMUKH

Digitally signed by SEEMA KETAN DESHMUKH
Date: 2022.07.16 11:19:02 +0530

सांगोला
दिनांक – १५/०७/२०२२

( सौ. एस. के. देशमुख )
दिवाणी न्यायाधीश क. सतर, सांगोला

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S. P. Parekar |
| (b) | Court | : | Mrs. S. K. Deshmukh,<br>Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 15/07/2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 15/07/2022 |